# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०७७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७११३


ई-मेलव्दारे

कालमर्यादा :

क्र:विकाअ/शिक्षण/पदविका गु.यादी/२०१७/ 2301

दिनांक :- 0 6 OCT 2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व एम.बी.ऐ /एम.सी.ए पदव्युत्तर पदवी संस्था
अमरावती विभाग अमरावती.

**विषय :- प्रवेशनियामक प्राधिकरणाच्या व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मधील** एम.बी.ए /एम.सी.ए पदव्युत्तर पदवी **अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवता याद्या पडताळणी करण्याबाबत**

संदर्भ :- १.प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुबंई यांचे पत्र क्रमांक बैठक१५१७/प्र.क्र२५८ /प्रनिप्रा/३२७, दि.२२/०८/२०१७
२.मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र२ अ/एडीएम/यादी पडताळणी/२०१७/१११३ दि.१६/०९/२०१७

उपरोक्त संदर्भाकित अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश नियामक प्राधिकरण व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या एम.बी.ए /एम.सी.ए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यांची पडताळणी सोबत जोडलेल्या वेळापत्रानुसार या कार्यालयात पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणी करतांना सर्वसाधारणपणे खालील कार्यपध्दती अवलंबविण्यांत येईल

१) प्रवेशनियामक प्राधिकरण व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करतांना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधीत सर्व कागदपत्राची आपले संस्था स्तरावर आवश्यक ती पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपले संस्थेत सर्व प्रकारच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रे पडताळणी केलेली असल्याचे संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी सोबत आणावे

२)गुणवत्ता **यादी पडताळणीसाठी संचालनलयांच्या संकेतांक व पासवर्डव्दारे ऑनलाईन पध्दतीने लॉगईन करुन आपले संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अद्यावत यादीची प्रिंटआऊट घेवून ती पडताळणीसाठी उपयोगात आणावी कोणत्याही परिस्थितीत संचालनालयाच्या संकेतस्थळाव्यतीरिक्त अन्य यादी** (उदा. Word File etc) **पडताळणीकरिता वापरला** जाणार नाही.

३)प्रवेश नियमांचे उल्लंघन करुन अथवा मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे किंवा कट ऑफ डेट नंतर प्रवेश करणा-या/अपलोड करणा-या संस्थानी अशा विद्यार्थ्याचे प्रवेश तात्काळ रदद करण्याचे आदेश संचालनालयाचे पत्र क्रमांक २ अ/एडीएम/२०१६/१२७५ दिनांक २०/०९/२०१६ नुसार देण्यात आलेले आहे.

४) गुणवत्ता यादीत काही अनियमितीता आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्था प्रमुखाची राहिल व तदअनुषंगाने गंभीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) पडताळणी करतांना उमेदवाराचे प्रवेश रद्द केले/झाले तर संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या आयडी लॉगीन करुन ऑनलाईन पध्दतीने अशा उमेदवाराच्या प्रवेश रद्द करण्यात येईल त्यांनतर यादीची नव्याने प्रिन्टआऊट काढून त्यानुसार पडताळणी करण्यात येईल.गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर आढळून आलेल्या सर्व त्रुटीची पुर्तता तात्काळ करण्यात यावी अन्यथा त्रुटी पुर्तता करण्यासाठी प्रलंबित न ठेवता असलेल्या त्रुटीसह याद्या प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

६) गुणवत्ता यादीतील जात वैधता प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य सर्व त्रुटी पुर्ण करणे आवश्यक आहे. व त्या त्रुटी पुर्ण केल्यानंतर त्या यादीमध्ये केवळ प्रवेशित उमेदवारांच्या जात वैधतेव्यतिरिक्त कोणतीही त्रुटी मा.कार्यलयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, शासकीय तंत्रनिकेतन, परिसर,वाद्रा(पुर्व),मुंबई यांना सादर करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७) या कार्यालयाचे स्तरावर संस्थेची गुणवत्ता यादी पडताळणी केल्यानंतर प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत जात वैधता नसलेल्या उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील क्रामांकाचा उल्लेख करुन तसे पत्र प्रवेश नियंत्रण समितीला आणि सबंधित विद्यापिठास कळविण्यात येईल.तसेच गुणवत्ता यादीची पडताळणी केल्यानंतर त्यायादीची मुळ प्रत या कार्यालयात ठेवण्यात येईल.संचालनालयास केवळ पत्राची प्रत सादर करण्यात येईल.

८) गुणवत्ता यादी पडताळणी करतेवेळी शुल्क परताव्याबाबत आपले संस्थेबदल काही तक्रार आहे किंवा कसे याची शहनिशा करुन व तक्रार असल्यास ती नियमानुसार निवारण करण्यात आली किंवा कसे याची पडताळणी केल्यानंतर त्यायादीची मुळ प्रत या कार्यालयात ठेवण्यात येईल., शुल्क परतावा किंवा कागदपत्रे परत न देणे अशा प्रकारच्या तक्रारीचे निवारण झालेले नसल्यास प्रवेश नियमावलीतील नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी व यापुढे अशाप्रकारचे नियमबाहय कृत्य होणार नाही. असे प्राचार्याकडून लेखी हमीपत्र सादर केल्यानंतरच गुणवत्ता यादी पडताळणी करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.तसेच शुल्क परताव्याबाबत संस्थेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नाही अशा अशयाचे प्रमाणपत्र आपले संस्थेतील प्राचार्याकडून सादर करावे. त्याचप्रमाणे नवीन संस्थानी आवश्यक रकमेची नियम ठेव (FD) भरणा केलेला आहे किंवा नाही याची सुध्दा पडताळणी करण्यात यावी ठेव भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर गुणवत्ता यादी पडताळणी करण्यात यईल.तसेच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या संस्थाना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिक्षद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे. अशा संस्थाकडून शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्काची आकरणी करण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार अशा संस्थानी नोदणी शुल्क भरण्यात यावे याची नोद घ्यावी.संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियाच्या गुणवत्ता याद्या या कार्यालयामार्फत त्वरीत पडताळणी करुन प्रवेश नियंत्रण समितीस सादर करणे गरजेचे असल्याने त्यानुसार आपण आपल्या संस्थेची गुणवत्ता यादीची त्वरीत पडताळणी करुन घ्यावी.

९) प्रवेश नियामक प्राधिकरणाने गुणवत्ता यादी सादर करण्यासाठी निश्चित केलेल्या शुल्कासह संस्थेने विहीत दिनाकापर्यत गुणवत्ता यादी सादर करणे आवश्यक आहे.

१०) संदर्भाकिंत प्रत्रातील मार्गदर्शन सुचनानुसार गुणवत्ता यादी पडताळणी बाबत कार्यवाही करण्यात येईल.

११) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर सदर संस्थेस सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI/COA) परवानगी असल्याचे कागदपत्रे तपासण्यात यावेत

१२)नवीन संस्थानी आवश्यक रकमेची नियत ठेव(F D )भरणा केली आहे किंवा नाही. याची पडताळणी करावी, भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी.तसेच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्या संस्थाना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थाकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे या अनुषंगिक बाबीची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपली राहिल याची नोंद घ्यावी.

१३) अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्राची संस्थेच्या प्राचार्यानी / संस्थाप्रमुखानी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी तपासणे.

१४) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादया पडताळणी करताना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. ही बाब पडताळणी पथकास सुचित करावी.शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्याक्रमाच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने प्रसिध्द केलेले असाधारण राजपत्र क्रमांक १०२ मध्ये तसेच पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

१५) अल्पसंख्यांक दर्जाचा संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्याक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

१६) महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम २०१५ दि.१७/०८/२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश/प्रवेशित उमेदावारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही. ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येऊ नयेत.असे प्रवेश रदबातल ठरविण्यात यावेत व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे.

१७)ज्या अभ्यासक्रमांची शैक्षणिक अर्हता पदवी अभ्यासक्रमाचे गुणांवर आधारीत आहे. अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित विद्यापीठाकडून पदवीसाठी ग्रेड ज्या गुणांवर देण्यात येते ते गुंण विचारात घेऊन पात्रता निश्चित करण्यात यावी.

१८)प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच या संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित सुचनेनूसार कार्यवाही करण्यात यावी.

१९) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी सादर करण्यासाठी संस्थेने विहीत दिनांकापर्यंत या कार्यालयात प्रवेश यादी सादर करणे आवश्यक असल्याचे आहे.

२०)मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता प्रकरणी दिलेल्या मुदतवाढी संदर्भातील सूचना विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी

२१)या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभाग,विद्यापीठ नियंत्रित संस्था यामधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतिरिक्त संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रवेशयादीची पडताळणी करण्यात यावी.

२२) ज्या उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या प्रवेश फेरीत संस्थेत अॅलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले Seat Accptance शुल्क भरले नाही. आणि एआरसी मध्ये रिपोर्ट केला नाही अशा उमेदवारांना संबंधित संस्थेत थेट जाऊन प्रवेश निश्चित करण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र अशा प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आकारण्यात येणारे रुपये १०००/- प्रोसेसिंग चार्जेस संस्थानी आकरुन ते एकत्रितरित्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडे विद्यार्थ्याच्या नाव आणि अॅप्लीकेशन आय डी सह सादर करणे आवश्यक राहील असेही कळविण्यात आलेले होते त्यानुसार संस्थांनी कार्यवाही केल्यानंतर त्या प्रवेशाची पडताळणी करावी

२३)प्रवेशित उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी होऊन नोंदणी झालेली आहे. याची खातरजमा करण्यात यावी. (PMSSS-J&K उमेदवारांचा अपवाद वगळून )

२४)एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च वा मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

२५)प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची व्यक्तीश: नोद घ्यावी.

**गुणवत्ता यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमवाहय प्रवेश अथवा कोणत्याही प्रकारची अनियमितताअसल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहिल.गुणवत्ता यादी पडताळणी करीता येतांना सोबत तपासणीकरीता लागणारे साहित्य( जसे - पेपर रिम, पंचिग मशिन, कॅलक्युलेटर,स्टॅप्लर, फ्लॅग ईत्यादी ) सोबत आणावे.**

**सहपत्रे :- १. वेळापत्रकाची प्रत**
**संदर्भांकित पत्राची प्रत.**

प्र. सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती.

प्रत:- १. प्रोग्रामर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता प्रथम वर्ष एमबीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्याकरीता संस्थेची यादी.

## LIST OF INSTITUTE

### DEGREE MBA

| अ.क्र. | डीटीई | संस्थेचे नाव | तपासणी दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | 1101 | Shri Sant Gajanan Maharaj College of Engineering,Shegaon | |
| 2 | 1102 | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | |
| 3 | 1105 | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | |
| 4 | 1106 | Hari Kishan Jaju Education Sanstha's,College of Management & Computer Science, Yavatmal | दिनांक ९/१०/२०१७ ते दिनांक १०/१०/२०१७ |
| 5 | 1107 | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati | |
| 6 | 1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering & Technology, Amravati | |
| 7 | 1121 | Shri Hanuman Vyayam Prasarak Mandals College of Engineering & Technology, Amravati | |

सहसंचालक
उच्च शिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करण्याकरीता संस्थेची यादी.

## LIST OF INSTITUTE

### DEGREE MCA

| अ.क्र. | डीटीई | संस्थेचे नाव | तपासणी दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | 1102 | Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | दिनांक ९/१०/२०१७ ते दिनांक १०/१०/२०१७ |
| 2 | 1105 | Prof. Ram Meghe Institute of Technology & Research, Amravati | |
| 3 | 1107 | P. R. Pote (Patil) Education & Welfare Trust's Group of Institution(Integrated Campus), Amravati | |
| 4 | 1111 | Shree Hanuman Vyayam Prasark Mandal's P.G. Department of Computer Science & Technology, Amravati | |
| 5 | 1113 | Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon | |
| 6 | 1266 | Harikisan Maloo Institute Of Management & Technology, Amravati | |

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.